REGISTERED No. B. 3434




# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ | पुणें, बुधवार तारीख २४ एप्रिल १९४६ | अंक १७




सारस्वत
को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
टे. नं. ३१६७५ २८–२–१९४६

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,१८,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. १,७६,००० |
| ठेवी ... | रु. ५९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ६४,००,००० |

नवीन योजना—"विम्याचे हप्ते, कॉलेज फी, हॉस्पिटल खर्च, कपडा, प्रवास खर्च वगैरे गरजांची खर्चविभागणी सुलभ रीतीनें करतां यावी, यासाठी ही योजना आहे. या योजनेनुसार दर महिना ५ ते २५ रु. पर्यंत बचत करून जास्त व्याज मिळवितां येतें."

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब–ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )







—: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

## विविध माहिती

**ब्रह्मदेशांतील जपानी चलनाचे दुष्परिणाम**—ब्रह्मदेश व्यापल्यानंतर जपानी लष्करी अधिकाऱ्यांनीं तेथें ५६२ कोटि रुपयांचें चलन प्रसृत केलें. हें चलन आतां कायदेशीर नसल्या-कारणानें कित्येक हिंदी व ब्रह्मी लोकांस असहायता प्राप्त झाली आहे.

**दुष्काळ निवारणास आर्थिक सहाय करा**—पुणें जिल्ह्यांतील पूर्व भागांतील दुष्काळग्रस्त भागांत सरकारच्या दुष्काळ-निवारण कामास पूरक काम करण्यासाठी स्थापन झालेल्या वरील समितीच्या कार्यासाठी सर्व नागरिकांनीं आर्थिक सहाय करावें अशी तिची विनंति आहे. आतापर्यंत रा. ब. आर. आर. काळे ट्रस्ट २०० रु., बुधवार पेठ नागरिक संरक्षण समिति १०० रु., पुणें सें. को. बँक २५१ रु., रा. सा. य. द. खोले १७ रु., ह्या-प्रमाणें देणग्या मिळाल्या आहेत.

**सर अलेक्झांडर ग्रे**—बँक ऑफ इंडिया लि. चे दीर्घ काळ मॅनेजर असलेले सर अलेक्झांडर ग्रे हे कांहीं वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले. आतां ते हिंदुस्थानांत दौऱ्यावर आले आहेत.

**मुंबई ते कलकत्ता वैमानिक वहातूक**—मुंबई ते नागपूर ते कलकत्ता अशी वैमानिक वहातूक टाटांनीं सुरू केली आहे. आठवड्यांतून दोनदां विमानांची ये-जा होते. पहिल्या विमानानें मुंबई ते कलकत्ता हा प्रवास सहा तासांच्या उड्डाणांत पुरा केला.

**कै. व्ही. व्ही. पंडित**—सदर्न निटिंग वर्क्स, विजय टेक्स्टाइल्स वगैरे कंपन्यांचे डायरेक्टर श्री. व्ही. व्ही. पंडित हे नुकतेच मृत्यु पावले.

**कारखान्यांत ४८ तासांचा आठवडा होणार**—कारखान्यांतील कामाचे कमाल तास आठवड्यांत ५४ ऐवजी ४८ असावे, असें ठरविणारी फॅक्टरी ॲक्टांतील दुरुस्ती असेंब्लीनें मान्य केली आहे. मोसमापुरते चालू राहणारे कारखाने कामगारांना सध्यां आठवड्यांत ६० तास काम देऊं शकतात ते ह्यापुढें ५० तास देऊं शकतील. सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें इष्ट वाटल्यास प्रांतिक सरकारांना कोणत्याहि उद्योगधंद्याचा ह्या नियमाच्या अंमलबजावणींतून अपवाद करतां येईल. ऑगस्ट, १९४६ पासून ही दुरुस्ती अंमलांत यावयाची आहे.

**हिंदुस्थानांतील चहाचा खप**—एप्रिल, १९४४ ते सप्टेंबर, १९४५ ह्या मुदतींत चहावरील जकातीचें उत्पन्न किती झालें ह्याचे आकडे खालीं दिले आहेत. निर्गत होणाऱ्या चहावर जकात आकारण्यांत येत नाहीं, तेव्हां जकातीच्या उत्पन्नास आठानें गुणलें म्हणजे हिंदुस्थानांत किती पौंड चहा खपला ह्याचा अंदाज येईल.

| मुदत | जकातीचें उत्पन्न (रु.) |
|---|---|
| एप्रिल १९४४ ते डिसें. १९४४ | १,२४,२३,००० |
| जानेवारी १९४५ ते सप्टें. १९४५ | १,१७,३१,०० |

वरील अठरा महिन्यांत १९ कोटि ३० लक्ष पौंड चहा खपला, असा अर्थ होतो. म्हणजे वार्षिक खप १ कोटि, ३० लक्ष पौंड, असा हिशेब निघतो.

**जर्मनींतील ब्रिटिश लष्कर**—ब्रिटिश लष्कर जर्मनींतून आणखी दहा वर्षें बाहेर पडणार नाहीं, असें फील्ड मार्शल मॉंटगॉमरी ह्यांनीं सांगितलें.

















—महाराष्ट्र सोल एजंट—
मे. जयप्रकाश ॲण्ड को
२५५।४ सदाशिव, पुणें







पुणें चीफ एजंटस:—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें



# मद्रास सरकारच्या कांहीं सहकारी योजना

युद्धांतून परतलेल्या सैनिकांची योगक्षेमाची सोय करण्याच्या दृष्टीनें मद्रास सरकारनें सहकारी सोसायट्यांच्या स्थापनेचा एक पंचवार्षिक कार्यक्रम आंखला आहे. त्याचप्रमाणें सहकारी खात्यांतील वरिष्ठ व कनिष्ठ जागांपैकीं ५०% जागा परतलेल्या सैनिकांसाठीं राखून ठेवण्याचा विचार आहे. ह्या जागांवर त्यांची नेमणूक करण्यापूर्वी त्यांस योग्य तें शिक्षण देण्याची मद्रास सरकार व्यवस्था करणार आहे. कोइमतूर येथें कांहीं गटांच्या शिक्षणास प्रारंभहि झाला आहे. सहकारी वर्कशॉप्स, जमीन-वसाहत सोसायट्या, सहकारी लेबर काँट्रॅक्ट सोसायट्या, इत्यादींची स्थापनाहि नियोजित आहे. अशा प्रकारच्या संस्थांचें नाविन्य लक्ष्यांत घेतां ह्या प्रयोगांचें महत्त्व विशेष आहे. मद्रास सरकारच्या प्रसिद्धी खात्यानें ह्या सहकारी संस्थांची माहिती देणारें एक चोपडें प्रसिद्ध केलें आहे.

शहरांत राहूं इच्छिणाऱ्या निवृत्त सैनिकांसाठी सहकारी वर्कशॉप्सची योजना आहे. कित्येक सैनिकांना लष्करांत यांत्रिक शिक्षण मिळालेलें आहे, त्याचा त्यांना पुढील आयुष्यांत फायदा व्हावा ह्या दृष्टीनें सहकारी वर्कशॉप्सची स्थापना केली जाईल. जमीन, इमारती, यंत्रसामुग्री, इत्यादींसाठी ह्या सोसायट्यांस येणारा खर्च सरकारनें द्यावा आणि खेळत्या भांडवलासाठी मध्यवर्ती सहकारी बँकांनीं कर्जें द्यावींत; सरकारनें व निमसरकारी संस्थांनीं ह्या सोसायट्यांकडून माल घ्यावा; कामगारांत नफा वाटला जावा व व्यवस्थेंतहि कामगारांस मोकळा हात असावा, असा ह्या योजनेचा थोडक्यांत तपशील आहे.

आज लागवडीखालीं न आलेल्या निवडक सरकारी जमिनी लागवडीसाठीं आणण्यासाठी लँड कॉलयनाझेशन सोसायट्यांची योजना आखलेली आहे. सरकार सोसायटीला जमीन मोफत देईल व जमिनीची मालकी सोसायटीकडे जाईल. म्हणजे सोसायटीच्या सभासदांचा जमिनीवर कोणत्याहि प्रकारचा मालकी हक्क राहणार नाहीं. पहिलीं कांहीं वर्षें जमिनीवर सारा आकारला जाणार नाहीं. सोसायटी ही जमीन दुसऱ्यास देऊं शकणार नाहीं. प्राथमिक खर्च सरकार सोशील. सभासदांमध्यें लागवडीसाठी जमीन वाटून देण्यांत येईल. प्रत्येकाच्या वाट्यास लागवड आर्थिक दृष्ट्या व्यवहारिक होईल, इतकी जमीन दिली जाईल. वारसा पद्धतीमुळें पुढें जमिनीचे तुकडे पडूं नयेत, ह्याची तरतूद सोसायटीच्या बॉयलॉजमध्यें शक्य तेवढी करण्यांत येईल. युद्धांतून परतलेल्या सैनिकांसच फक्त सोसायटीचे सभासद होतां येईल हें उघड आहे. सभासदांचे सर्व व्यवहार सोसायटीमार्फत व्हावेत, अशी अपेक्षा आहे. तूर्त चाळीस वसाहतींचीं केंद्रें निश्चित करण्यांत आलीं असून दहा सोसायट्या प्रत्यक्ष स्थापन होत आहेत.

रस्ते व घरें ह्यांच्या बांधकामास आतां मोठ्या प्रमाणावर प्रारंभ होईल आणि त्याकरितां सुतार, गवंडी, रंगारी, फिटर, बिगारी वगैरे लागतील. ज्या निवृत्त सैनिकांस दुसरें काम करतां येणार नाहीं, अशांनीं संघ शक्तीनें, खासगी कंत्राटदारांच्या ऐवजी सहकार्यानें मोठीं कामें पार पाडावीं अशी कल्पना सहकारी कामगार कंत्राट सोसायट्यांच्या मुळाशीं आहे. जरूर तर बिगर-सैनिकांसहि ह्या सोसायट्यांत घेतलें जाईल. सोसायटी हत्यारें विकत घेऊन ठेवील, कामाचीं कंत्राटें मिळवील व सभासदांना मजुरी देऊन तीं पार पाडील. वेलोर येथें अशा प्रकारची ३०० कामगारांची एक सोसायटी स्थापन करण्यांत आली आहे. सरकारचें पब्लिक वर्क्स खातें अशा सोसायट्यांस सर्व प्रकारचें सहाय करणार आहे.

---

# सहकारी तत्त्वाचें प्राचीनत्व व अबाधितत्व

## श्री. सरय्या ह्यांचे विचार

बडोदें राज्य सहकारी परिषदेचें अधिवेशन एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांत मुं. प्रां. सहकारी बँकेचे चेअरमन व हिंदुस्थान सरकारच्या सहकारी नियोजन समितीचे अध्यक्ष श्री. आर. जी. सरय्या ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. सहकाराचें तत्त्वज्ञान ऋग्वेदापासून चालत आलेलें आहे आणि आजहि इतर कित्येक बाबतींत मतभेद असला तरी सहकाराच्या प्रसारांत देशाचा लाभ आहे, ह्या बाबतींत सर्वांचें एकमत आहे. आपणांस दारिद्र्यरूपी राक्षसाचा नाश करण्यासाठी सहकार व साक्षरताप्रसार ह्या दोघांची जरूरी आहे असें सांगून त्यांनीं त्यांपैकीं सहकाराची महति आपल्या भाषणांत प्रतिपादन केली. देशाची उन्नति करण्याकरितां एकादी सहकारी योजना पार पाडावयाची असल्यास त्या योजनेशीं संबंध येणाऱ्या व्यक्तींवर सक्ती करावी काय, असा प्रश्न आतां अधिकाधिक महत्त्वाचा होत जाणार आहे. असें सभासदत्व कोणावरहि सक्तीनें लादूं नये, परंतु सार्वजनिक हिताच्या योजनेला जर एखादी व्यक्ती आडवी येत असेल, तरच तिच्यावर कायद्यानें बंधन घालावें असें मत श्री. सरय्या ह्यांनीं प्रतिपादन केलें. परंतु, अशा सक्तीची जरुरच पडूं नये, ह्या दृष्टीनें स्थानिक सहकारी संस्थांमार्फत यशस्वी प्रचार होऊं शकला तर फार उत्तम. निर्धन देशास धनवान करण्यासाठी जीवनोपयोगी वस्तूंचें उत्पादन वाढविलें पाहिजे आणि त्यांत शेतीचें महत्त्व फार मोठें आहे, असें सांगून त्यांनीं त्याबाबत आपली प्राथमिक सहकारी मंडळीच्या कार्याची योजना विशद केली. संघटित शेतीच्या बाबत बडोदें सरकारनें तिलकवाडा तालुक्यांत आंखलेल्या योजनेचा त्यांनीं उल्लेख केला.

शेतीच्या वाढीबरोबरच घरगुती उद्योगधंदे वाढविण्यास दृष्टीच्या हिंदुस्थानच्या परिस्थितींत सहकारी संस्थांची संघटना हा एकच मार्ग आहे, असें सांगून त्यासाठी सरकारनें उद्योगप्रेरक संस्था स्थापण्याचें महत्त्व श्री. सरय्या ह्यांनीं प्रतिपादलें आणि अशा संस्थेच्या कार्यक्षेत्राचेंहि त्यांनीं वर्णन केलें. प्रत्येक खेड्यांतून जर विजेचा प्रसार झाला तर खेडेगावी धंद्यांची वाढ झपाट्यानें होईल. मजुरांना देखील सहकारी संस्थांची फार जरूरी आहे असें त्यांनीं सांगून त्यांच्या संस्था काय कार्य करूं शकतील ह्याची त्यांनीं कल्पना दिली. आजच्या अमलेंलांत मद्रास प्रांतांतील अशा प्रकारच्या उपक्रमांची चर्चा केलेलीच आहे. देशाची जिवंत दौलत म्हणजे जनावरें ह्यांची पैदास वाढविणें, त्यांच्या रोगनिवारणाची व्यवस्था करणें, दुग्ध पुरवठा वाढविणें, शेतीच्या मालविक्रीची व्यवस्था, इत्यादि अनेक बाबतींत सहकारी संस्थांस समाजाची सेवा करतां येईल. हें सर्व सुलभ व्हावें ह्याकरितां सहकारच्या शिक्षणाची व्यवस्था अगोदर झाली पाहिजे. सहकारच्या प्रसाराच्या कोणत्याहि योजनेंत अशा शिक्षणास प्राधान्य दिलें जातें व तें योग्यच आहे. खास शिक्षण वर्ग चालवून व प्रचाराच्या सर्व साधनांचा उपयोग करून सहकारी तत्त्व व व्यवहार ह्यांचा फैलाव केला पाहिजे. देशामध्यें सहकारी तत्वाचा प्रसार जेवढा सत्वर होईल तितकी उन्नति लवकर घडून येईल, हें श्री. सरय्या ह्यांच्या भाषणाचें सार आहे. सहकारी संघटनेचें महत्त्व, प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें, पक्षातीत असल्याकारणानें, तिचा प्रसार होण्यास सर्वांचें हार्दिक सहाय्य मिळालें पाहिजे. सहकारी नियोजन समितीनें संबंध हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीचा सर्वांगीण विचार नुकताच केलेला आहे. ह्या दृष्टीनें समितीचे अध्यक्ष, श्री. सरय्या ह्यांच्या ताज्या उद्‌गारांचें महत्त्व विशेष आहे.

# स्फुट विचार

### मि. लेहमन यांची सडेतोड टीका

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मदत-पुनर्घटना समितीचे सेवानिवृत्त संचालक मि. लेहमन यांनीं वॉशिंग्टन येथें भरलेल्या अन्नसमितीला स्पष्ट शब्दांत इषारा देऊन पूर्वेकडील देशांतील लोकांच्या अन्नान्नदशेकडे लक्ष वेधलें. "हिंदुस्थान, ब्रह्मदेश आणि सीलोन येथील अन्नधान्यविषयक परिस्थिति मनाला चरका देणारी आहे," असे उद्गार काढून ते पुढें म्हणाले, "अमेरिकन सरकार अजूनहि माहिती मिळविण्यांत दंग आहे हें पाहून मला खेद होतो. सरकारजवळ ही माहिती भरपूर आहे. पण अर्धपोटी स्त्रिया व मुलें यांचीं दीन तोंडें दिसत असतांना आणखी माहिती ती काय पाहिजे ?". युरोपांतील व आशियांतील ५० कोटि लोकांना दर महिना फक्त १० लाख टन धान्य पुरविण्याचें अमेरिकेनें कबूल केलें आहे. मि. लेहमन यांनीं आपल्या संचालकत्वाचा राजीनामा दिला त्या वेळीं तो प्रकृतीच्या अस्वास्थ्यासाठीं दिला असें जाहीर केलें होतें. परंतु आतां प्रे. ट्रूमन आणि मि. लेहमन यांच्यांत चाललेल्या वादावरून त्यांनीं दिलेला राजीनामा परस्परांच्या मतभेदांतून उत्पन्न झाला असला पाहिजे असें दिसतें. जगाच्या आजच्या अन्नधान्याच्या विकट परिस्थितींत माहिती गोळा करण्याच्या नादांत उपाशी अगर अर्धपोटी लोकांना वेळेवर अन्न पोचविण्याच्या कामीं दिरंगाई होता कामा नये. प्रे. ट्रूमन यांनीं येत्या तीन महिन्यांत जगाची अन्नधान्य परिस्थिति सुधारेल असा आशावाद प्रकट केला होता. खुद्द मि. लेहमन यांना मात्र ही फोल आशा वाटत असून या विषयावरील त्यांचें मत अधिक ग्राह्य धरलें पाहिजे. कारण जागतिक अन्नधान्याची गरज आणि पुरवठा करण्याची शक्यता याबद्दल माजी संचालक या नात्यानें त्यांना अधिक तपशीलवार माहिती असली पाहिजे हें उघड आहे.

---

### अन्नधान्याच्या पुरवठ्याबाबत चालढकल

सर्व जगांतील तुटवड्याचा विचार करतां अन्नधान्याची निर्मिति पुरेशी नाहीं अशी हाकाटी चालू वर्षाच्या प्रारंभापासूनच ऐकूं येऊं लागली. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी स्थापन झालेल्या संयुक्त अन्नधान्य समितीच्या बैठकींत घेण्यांत आलेले निर्णय अंमलांत आणण्याच्या कामीं विलंब लागत आहे. त्यांतच अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. ट्रूमन आणि शेतकी खात्याचे चिटणीस मि. अँडरसन यांनीं फेब्रुवारी व मार्च महिन्यांत हिंदुस्थानांत पडलेल्या पावसामुळें तेथील परिस्थिति सुधारली आहे असें वक्तव्य केलें. त्याला हिंदुस्थान सरकारचे अन्न-चिटणीस सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव यांनीं उत्तर दिलें आहे. हिंदुस्थानांतील कांहीं प्रांतांतून दर दिवशीं दरडोई देण्यांत येणाऱ्या गव्हांत कपात केल्यामुळेंच हिंदुस्थानांत मे अखेरपर्यंत तीव्र टंचाई भासणार नाहीं असें त्यांनीं सांगितलें. पंजाबांत गव्हाची कपात १२ औंसांवरून ६ औंसांपर्यंत व संयुक्त प्रांतांत ४ औंसांपर्यंत करण्यांत आली आहे. १९४६ च्या जूनपर्यंत संयुक्त-समितीनें हिंदुस्थानला १४ लाख टन गहूं आणि मका, त्याचप्रमाणें १ लाख ४५ हजार टन तांदूळ देण्याचें कबूल केलें खरें; पण हें धान्य अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांत आणून पोचविण्याची व तेथून जहाजावर चढविण्याची व्यवस्था निदान वेळेवर होण्याचीं लक्षणें दिसत नाहींत. हिंदुस्थानांतील बहुसंख्य लोक अन्नधान्याचा प्रामुख्यानें उपयोग करणारे असून त्यांना वेळेवर अन्नधान्याचा पुरवठा झाला नाहीं तर प्रसंग कठीण आहे, असें सर साहेबांनीं बोलून दाखविलें. जगाच्या पूर्व गोलार्धांतील परिस्थिति चिंताजनक असतांना अमेरिकेंत मात्र अन्नाचा मुबलक पुरवठा आहे, इतकेंच नाहीं तर अमेरिकेतील लोक पोटाला तडस लागेपर्यंत खाऊन वर अन्नाची नासधूस करीत आहेत असें प्रे. ट्रूमन यांनीं वृत्तपत्रीय मुलाखतींत बोलून दाखविलें.

---

### राष्ट्रसंघाची अखेर

राष्ट्रसंघाच्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्यासाठीं जिनिव्हा येथें जमलेल्या संघाच्या प्रतिनिधींनीं एक बोर्ड नेमण्याचें ठरविलें आहे, या बोर्डावर नेमावयाच्या प्रतिनिधींच्या नेमणुका करण्यासाठीं एक खास समिति निर्माण करण्यांत आलेली आहे. बोर्डाकडून जुन्या राष्ट्रसंघाच्या मालकीची मालमत्ता नवीन संयुक्त राष्ट्रसंघाच्या हवाली करण्यांत यावयाची आहे. चीन आणि हिंदुस्थान यांचे प्रतिनिधी नेमणूक समितीवर घेण्यांत आलेले आहेत. जपाननें चीनवर पहिलें आक्रमण करून मांचुरिया घशांत घातला. त्यावेळीं राष्ट्रसंघांत इंग्लंडच्या प्रतिनिधीनें जपानची वकिली केली. हिंदुस्थानचा राष्ट्रसंघावरील प्रतिनिधि तर काय ब्रिटनच्या हाताला हात लावण्यासाठींच घेतला गेला होता. राष्ट्रसंघाच्या अपेशी कारकीर्दींत चीन व हिंदुस्थानला मुळींच नसणारें महत्त्व, कागदोपत्रीं कां होईना, राष्ट्रसंघाचें और्ध्वदेहिक पार पाडतांना त्यांना मिळालेलें दिसतें. फिनिलंड-रशिआ यांच्यांत १९३९ सालीं सुरू झालेल्या युद्धानंतर रशियाची राष्ट्रसंघांतून हकालपट्टी करण्यांत आलेली होती. परंतु नाझी विरोधी युद्धांत रशियानें बजावलेल्या कामगिरीची ओळख ठेवण्यासाठीं म्हणूनच केवळ राष्ट्रसंघाच्या आर्थिक समितीनें रशियाच्या गौरवपर ठराव ठराव मंजूर केला. ज्या कमिटीच्या खटपटीनें हा मंजूर झाला त्याच कमिटीनें राष्ट्रसंघाच्या मालमत्तेंत रशियाला वाटा यावा अशा आशयाची एक सूचना फेटाळून लावली. सदर सूचना झेकोस्लोव्हाकिया व पोलंड यांच्यातर्फे मांडण्यांत आली होती. पूर्व युरोपमधील स्लाव्ह वंशांचीं राष्ट्रें सोव्हिएट रशियाच्या राजकीय कक्षेंत गेल्याचीं हीं स्पष्ट चिन्हें आहेत. याशिवाय रुमेनिया, ऑस्ट्रिया, युगोस्लाव्हिया, हंगेरी इत्यादि बाल्कन राष्ट्रांचे रशियाशीं आर्थिक करार होत असून त्या प्रमाणांत इंग्लंड-अमेरिकेचें वजन कमी होत चाललें आहे.

---

### रिझर्व्ह बँकेच्या शेअर्सची किंमत कां वाढली

हिंदी रिझर्व्ह बँकेच्या शेअर्सची किंमत वाढत चालली आहे. त्याच्या कारणांत रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयकरण होण्याचा संभव आहे, ही अपेक्षा हें एक प्रमुख कारण आहे. बँकेच्या वसूल भांडवलाइतकाच तिचा रिझर्व्ह फंड आहे. तेव्हां भागीदारांना शेअरच्या किंमतीच्या दुप्पट पैसे मिळूं शकतील, असा कित्येकांचा समज आहे. बँकेच्या कायद्याचें ५७ वें कलम ह्यासंबंधात स्पष्ट आहे. बँक गुंडाळण्यांत आली, तर तिच्या भागीदारांस भागाची दर्शनी किंमत अधिक बँक ॲक्टाच्या प्रारंभापासूनच्या प्रत्येक वर्षाकरतां १% (कमाल २५%) एवढीच रकम मिळूं शकेल, असें तें कलम सांगतें. १९४६ अखेर बँक गुंडाळण्यांत आली, तर भागीदारांना १०० अधिक १२ रुपये मिळतील. कांहीं झालें तर १२५ रुपयांपेक्षा जास्त रकम कधींच मिळूं शकणार नाहीं, हें उघड आहे. हिंदी फडणविसांच्या असेंब्लीमधील सूचक उद्गारांपूर्वी बँकेच्या शेअरची किंमत १५७ रु. ८ आ. होती ती वाढत वाढत आतां १७० रुपयांवर गेली आहे.

## सर लल्लुभाई सामळदास ह्यांचा आदर्श

### सहकारी कार्यकर्त्यांस सर जनार्दन मदन ह्यांचें मार्गदर्शन

सटाणा को. सीड सप्लाय अँड सेल सोसायटी लि. नें बांधलेल्या सर लल्लुभाई सामळदास रेस्टहौसचा उद्घाटन समारंभ व बागलाण तालुका सहकारी परिषद ह्यावेळीं प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष सर जनार्दन मदन ह्यांनीं मुख्य पाहुणे ह्या नात्यानें केलेल्या भाषणाकडे वाचकांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे. ज्या थोर व्यक्तीचें स्मरण कायम व दृश्य स्वरूपानें आपल्यापुढें रहावें म्हणून हा समारंभ घडवून आणण्यांत आला, त्या वैकुंठवासी सर लल्लुभाई सामळदास ह्यांच्या कार्याचें सर जनार्दन मदन ह्यांनीं वर्णन केलें. सर लल्लुभाई सामळदास हे अव्वल दर्जाचे व नाणावलेले अर्थशास्त्रज्ञ होते आणि गरीब जनतेची, विशेषतः शेतकरी बंधूंची आर्थिक उन्नति कशी होईल ह्याबद्दल त्यांना सदैव ध्यास लागून राहिलेला असे. सहकारी चळवळीच्या सहायानें शेतकऱ्यांचें आर्थिक जीवन सुधारण्याचा त्यांनीं आपल्या आयुष्यांत आटोकाट प्रयत्न केला. उमद्या स्वभावाचे व दानशूर म्हणूनहि त्यांची ख्याती होती. अशा नामवंत, ध्येयनिष्ठ व कार्यनिष्ठ व्यक्तीची आठवण रेस्टहौसचा हॉल बांधून कायम राखण्याची कामगिरी सटाणा को. सीड सप्लाय अँड सेल सोसायटीनें केली, ह्याबद्दल तिचें सर जनार्दन मदन ह्यांनीं हार्दिक अभिनंदन केलें व सर लल्लुभाईंच्या कार्याची परंपरा बागलाण तालुक्यांतील जनतेनें चालू ठेवावी, असें सुचविलें. उत्साह व एकोपा कायम ठेवण्याचें व लावलेला दीप सतत तेवत ठेवण्याचें महत्त्वहि त्यांनीं प्रतिपादन केलें.

सहकारी संस्थांचीं कामें दिवसानुदिवस वाढत चाललीं आहेत व त्यांच्या जबाबदाऱ्यांत भर पडत आहे. ह्या वाढत्या जबाबदाऱ्यांबरोबर तज्ज्ञ व शिकलेलीं माणसें नोकरवर्गांत असणें कसें आवश्यक आहे, ह्याचें विवेचन सर जनार्दन मदन ह्यांनीं आपल्या भाषणांत केलें. कामाच्या सातत्याच्या दृष्टीनें, कोणतीहि संस्था एका माणसाचे पायावर सर्वस्वी अवलंबून रहाणें हितावह नाहीं; लायक माणसें तयार करून त्यांच्यामध्यें जबाबदारीची वाटणी योग्य प्रमाणांत केली जाणें इष्ट व जरूरीचें आहे ही सर जनार्दन ह्यांची सूचना अत्यंत महत्त्वाची आहे. सहकारी संस्थांच्या नोकरवर्गाच्या कार्यक्षमतेचा प्रश्न फार जुना आहे परंतु वाढत्या जबाबदाऱ्यांबरोबर तो प्रश्न सत्वर सोडविण्याची आवश्यकताहि वाढत चालली आहे.

शेतकरी ऋणविमोचन कायदा मुंबई प्रांताच्या कित्येक भागांत अंमलांत आला आहे. त्या कायद्याप्रमाणें अर्जदार शेतकऱ्यांना कर्ज देण्याची एक महत्त्वाची जबाबदारी सहकारी संस्थांवर येणार आहे, तिचाहि उल्लेख सर जनार्दन ह्यांनीं आपल्या भाषणांत केला. ह्या कायद्याखाली पिकांचे तारणावर कर्जें दिलीं जाणार आहेत व सहकारी संस्थेच्या परवानगीशिवाय अशीं कर्जें घेणाऱ्या शेतकऱ्यांस आपल्या पिकाची परस्पर विल्हेवाट लावतां येणार नाहीं. सहकारी पतपेढ्या व खरेदी-विक्री करणाऱ्या संस्था ह्यांचे कार्यपद्धतींत योग्य अशी सांगड घालावी लागेल, परंतु त्यांत अडचण पडण्याचें कारण नाहीं. ज्या थोर व्यक्तीच्या स्मरणार्थ प्रस्तुत समारंभ घडवून आणण्यांत आला, तिच्या कामगिरीची व संदेशाची आठवण ठेवून परंपरा पुढें ठेवू, अशा आत्मविश्वासानें आपण कार्यास लागावें, हा सर जनार्दन मदन ह्यांचा सल्ला सर्व सहकारी संस्थांनीं मनन करण्याजोगा आहे.

## मुंबई प्रां. सहकारी बँक लि.

संगमनेर उपशाखेच्या उद्घाटन प्रसंगीं बँकेचे सिनिअर इन्स्पेक्टर श्री. घारप ह्यांनीं केलेलें भाषण.

"१९२६ चे सुमारास शेतकी सोसायट्यांना कर्ज देण्याचें काम बँकेकडे आल्यानंतर संगमनेर व अकोला ह्या तालुक्यांत शेतकी सोसायट्या काढण्यास प्रारंभ झाला, परंतु अस्तित्वांत असलेल्या सोसायट्यांची खालावलेली स्थिति व स्थानिक पुढाऱ्यांत उत्साहाचा अभाव ह्यामुळें तें काम मागें पडलें. पुढें मंदीच्या काळांत सहकारी खात्याचें धोरण खालावलेल्या सोसायट्या सुधारण्याकडे विशेषतः लागल्यामुळें नवीन सोसायट्यांची वाढ झाली नाहीं. परंतु चालू लढाईच्या काळांत सोसायट्यांकडे कांहीं कामें सोपविण्यांत आलीं व त्यामुळें संघटनेचें महत्त्व सर्वसाधारण लोकांत जास्त वाढलें. शेतकरी ऋणविमोचन कायद्यानें नवीन सोसायट्या निघण्यास प्रोत्साहन मिळालें. रा. मारुतराव गायकवाड तालुका ऑनररी ऑर्गनायझर यांनीं नवीन सोसायट्या काढण्याकरतां बरेच परिश्रम घेतले. हल्ली या भागांत निरनिराळ्या प्रकारच्या सुमारें ३० सोसायट्या आहेत. त्यांच्या व्यवहाराकरितां बँकेची शाखा जवळ असणें जरूर आहे. या सोसायट्यांनीं मागणी केल्यावरून त्यांच्या सोयीकरतां म्हणून विशेषतः शाखा उघडण्यांत येत आहेत. बँकेची शाखा जवळ असल्यानें सोसायट्यांवर देखरेख करणें, त्यांच्या अडीअडचणींचा विचार करणें, प्रवासखर्चांत बचत होणें या गोष्टी साध्य होतात.

"सोसायट्यांच्या व्यवहाराबरोबर ही बँक इतर बँकिंग व्यवहार करून व्यापारी वर्गाच्या उपयोगी पडूं शकेल. व्यापाऱ्यांकरितां चालू, सेव्हिंग व मुदतींचीं खातीं उघडून त्यांना हुंड्या विकणें, त्यांच्या हुंड्या पटण्याकरितां स्वीकारणें, मालाचे तारणावर पैसे देणें, वगैरे व्यवहार ही बँक करूं शकेल. परंतु असा व्यवहार करतांना तेथील इतर बँकांशीं व विशेषतः नगर अर्बन बँकेशीं स्पर्धा होणार नाहीं अशी दक्षता घेतली जाईल. ही शाखा मध्यम वर्गीय व श्रीमंत लोकांच्या ठेवी स्वीकारून त्यांच्याहि उपयोगी पडेल."

## नियंत्रित जिनसांच्या वाटणीचें काम

ले:—बाळासाहेब बाबासाहेब पाटील, माळशिरस

माळशिरस तालुक्यामध्यें कंट्रोल नियंत्रित जिनसांची वाटणी खालीलप्रमाणें आहे. कापड वाटप सेंटर १० आहेत आणि धान्य वाटप सेंटर १५ आहेत. कापड वाटप सेंटरपैकीं ४ कापड वाटप सेंटर्स सहकारी संस्थांमार्फत चाललेली आहेत. तसेंच ९ धान्य दुकानें सहकारी संस्थांमार्फत चाललेली आहेत. सहकारी संस्थांमार्फत वाटणीचें काम व्यक्तीपेक्षां संस्थेकडून उत्तम प्रकारें केलें जातें. ही बाब सरकारी अधिकारी, मुलकी, सप्लाय व सहकारी खातें, यांना पूर्णपणें पटलेली आहे. परंतु अद्यापि सरकार ह्या सर्व जिनसांची वाटणी सहकारी संस्थामार्फत कां करीत नाहीं ? वास्तविक एकाच गांवांत व्यक्तीकडे एक आणि सहकारी संस्थेकडे अशीं दोन दुकानें ठेवणेची जरूरी नाहीं.

तसेंच धान्य वाटप केन्द्रें व कापडाचीं दुकानें शक्य तीं ज्या त्या गांवच्या सहकारी संस्थेकडे द्वेणेंत यावीत. ज्या ठिकाणीं सहकारी संस्था कार्यक्षम नसेल त्या ठिकाणीं एकदी तालुका सहकारी संस्था काम करूं शकेल. तरी या दृष्टीनें विचार होणें अत्यंत जरूर आहे. येवढी मात्र गोष्ट सर्वांना कबूल करावी लागेल कीं व्यक्तीपेक्षां सहकारी संस्थेकडून हें काम निस्पृहतेनें केलें जातें.

### हिंदी रुपयांच्या तारणाच्या घटकांतील प्रमाणांत बदल

हिंदी चलनी नोटांच्या तारणाची तुलना शेठ जी. डी. बिर्ला ह्यांनीं युनायटेड कमर्शिअल बँकेच्या वार्षिक सभेंत आपल्या भाषणांत केली. ते म्हणाले, " सोनें, स्टर्लिंग रोखे, रुपये व रुपयांतील रोखे ह्यांचें हिंदी चलनास तारण असतें. एकूण १९३९ सालीं तारणाच्या २०·४% इतकें तारण सोन्याचें होतें; आतां हें प्रमाण ३·६% वर आलें आहे. पूर्वी रुपयांचा (ह्यांत फक्त चांदीच्या रुपयांचाच समावेश होत असे) भरणा २४·७% असे. तो (एक रुपयावाल्या नोटांचा समावेश रुपयांत करूनहि) आतां ०·८% झाला आहे. रुपयांतील रोख्यांचें प्रमाण १७·१% वरून ४·६% वर आलें आहे. स्टर्लिंग रोख्यांचें तारण मात्र २७·८% वरून ९१% वर गेलें आहे. पूर्वी स्टर्लिंग रोख्यांचें रूपांतर इतर देशांचीं चलनें व सोनें ह्यांत करितां येत असे; आतां ते रोखे गोठून पडले आहेत."

### युद्धांत ग्रंथांचा नाश

गेल्या महायुद्धांत युरोपांतील ग्रंथ व ग्रंथालयें ह्यांचा फारच मोठ्या प्रमाणावर नाश झाला. पोलंडमधील एकूण ग्रंथालयांपैकीं ७०% उध्वस्त झालीं किंवा लुटलीं गेलीं. एकट्या युक्रेनमध्येंच रशियाचे ५½ कोटि ग्रंथ नष्ट झाले. झेकोस्लोव्हाकिया आपल्या निम्म्या ग्रंथभांडारास मुकला. इंग्लंडमधील ३० मोठ्या ग्रंथालयांवर बॉंब पडले. जे ग्रंथ जर्मनीच्या बॉंबहल्ल्यामुळें किंवा त्यांनीं लावलेल्या आगीमुळें नाश पावले नाहींत त्यांतील बहुतेकांचा रोधा केला जाऊन त्यापासून कोरे कागद बनविण्यांत आले. कित्येक प्रसंगीं ग्रंथालयांचा बचाव व्हावा म्हणून केलेल्या प्रयत्नांमुळेंच ग्रंथांचा नाश झाला! कांहीं ठिकाणचे ग्रंथ सुरक्षित स्थळीं नेले ते पावसानें, वाळवीनें व उंदरांनीं खलास केले, परंतु मूळ ग्रंथालयें शाबूत राहिलीं!


गुढी पाडव्याच्या सुमुहूर्तावर परवानगी मिळाली

## दी कॉन्टिनेन्टल म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी

लिमिटेड, मुंबई

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

बॅ. व्ही. एन्. पाटील, एम्. बी. इ., एम्. ए. (कॅन्ट.), बार-ॲट-लॉ, एक्स. एम्. एल्. ए., एक्स. एम्. एल. सी. प्रेसिडेंट, खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटी, डायरेक्टर, दि सुप्रीम केमिकल ॲन्ड इंडस्ट्रियल कंपनी लि. इ. इ. जळगांव (पूर्व खा.) (चेअरमन)

शेठ एन. एच. नाईक, बी. ए., लॅन्डलॉर्ड व बँकर, पुणें. (व्हाईस-चेअरमन)

श्री. जी. एम्. गुप्ते, बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट, डायरेक्टर मिप्ला कमर्शिअल कं. लि., इ. पुणें. (चेअरमन, एक्झिक्युटिव्ह कमिटी)

शेठ आर्. एन्. शहा, मर्चंट व लँडलॉर्ड, प्रोप्रायटर मे. हुकुमचंद ईश्वरदास, प्रोप्रायटर मे. गुजरात मेटल फॅक्टरी, पुणें.

बॅ. व्ही. व्ही. ओक, बी. ए., एलएल. बी., बार-ॲट-लॉ, मुंबई.

श्री. व्ही. के. रेळे, मर्चंट व लँडलॉर्ड, प्रोप्रायटर, मे. के. बी. रेळे सन्स ॲन्ड को., डायरेक्टर प्रॉपर्टी ओनर्स ॲसोसिएशन लि., मुंबई.

शेठ एच. सी. शिवजी, मर्चंट, डायरेक्टर, बॉम्बे क्लॉथ मार्केट कंपनी लि., मुंबई.

श्री. के. जी. परोपकारी, बी. ए. (ऑनर्स) (एक्स ऑफिशिओ डायरेक्टर), पुणें.

—: मॅनेजिंग डायरेक्टर :—

श्री. के. जी. परोपकारी, बी. ए. (ऑनर्स)

—: मेडिकल बोर्ड :—

डॉ. एम्. व्ही. भाजेकर, एम्. ए. (ऑक्सन), एम. बी. बी. सी. एच. (ऑक्सन), एफ. आर. सी. एस. (एडिन), मुंबई.

डॉ. व्ही. एन्. भावे, एम्. बी. बी. एस., पुणें.

डॉ. एस. एस. चोभे, एम. बी. बी. एस., पुणें.

—: ॲक्चुअरी :—

श्री. एम्. व्ही. सोहोनी, एम्. एससी., ए. आय. ए., मुंबई.

—: सॉलिसिटर्स :—

मे. माणिकलाल खेर अंबालाल आणि कंपनी, मुंबई.

मे. के. जे. काळे आणि कं. मुंबई.

बँकर्सः—दि बँक ऑफ इण्डिया लि., पुणें दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें

वरील प्रतिष्ठित मंडळींच्या नेतृत्वाखालीं कंपनीची स्थापना झाली असून ती लवकरच कामास सुरुवात करीत आहे. सुरुवातीपासून कंपनीच्या उत्कर्षास कारणीभूत होणाऱ्या एजन्टसना खास अटी देण्यांत येणार असून होतकरू व वजनदार व्यक्तींना विशेष सवलती देण्यांत येतील.

खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावाः—
मुंबई ऑफिस—अडवानी चेंबर्स, ४ था मजला,
सर फिरोजशहा मेहता रोड,
फोर्ट, मुंबई.

मॅनेजिंग डायरेक्टर
दि कॉन्टिनेन्टल म्युच्युअल
ॲशुअरन्स कंपनी, लि.
६५ सरस्वती विलास बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २

वर्ग पुस्तकें बंद

# मुंबई शेअर बाजार

स्वदेशी मिल्स १२-४-४६ } ४-५-४६ }

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज-वजा
इंडि. यु. ऑ. ०-१५-० दि. १७-६-४५
इंडि. यु. डि. ०-३-० दि. १०-६-४५
नागपूर रु. ५ दि. २९-४-४६
स्वदेशी रु. २२ दि. १५-५-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १६।४।४६ | बुधवार १७।४।४६ | गुरुवार १८।४।४६ | शुक्रवार १९।४।४६ | सोमवार २२।४।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | | २८६५—० | २८४१—४ | | २८६५—० |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | ५११—० | ५०८—० | | ५१२—८ |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०-०-० S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | २३६०—० | २३५५—० | | २३७८-१२ |
| ७०२; ५६६ | १९——० † | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | ८६०—० | ८५८—० | | ८८३—० |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | | ७६८—० | ७६९—० | | ७७१—० |
| ४४३-८; ३६० | ५-०-० † | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | | ४६३—० | ४६५—८ | | ४७२—० |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | | ३८५—० | ३९२—० | | ४०८—० |
| ३३५; २८३-८ | ८-०-० S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | | ३५४—८ | ३५४—० | | ३६८—० |
| ३३७; २४३ | ४-०-० † | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | | ३८०—० | ३८७—० | | ४०३—० |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | | ५—८ | ५—६ | | ५-८-६ |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | २१—११ | २१-८-६ | | २१-१२-० |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | „ डिफर्डस् | १ | | ४—१—३ | ४-०-९ | | ४-१-९ |
| ७९०; ६४५ | ३५-०-८ | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | ८०७—८ | ८०७—८ | | ८२१—४ |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सिमेंट | १०० | | २५१—० | २५०—८ | | ९५१—८ |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | २८९—० | २८९—० | | २८७—० |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | ६४३-१२ | ६४०—० | | ६५०—० |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | | ३८—८ | ३८-१४ | | ४१—२ |
| | | | ३½% रोखे | १०० | | १०२-१२ | १०२-११ | | १०२-१४ |

सोमवार दि. २२-४-४६ चे भाव

**३% गव्हर्मेंट लोन्स**

| | |
|---|---|
| १९४६ | १०१-९ |
| १९५१-५४ | १०२-१ |
| १९५७ | १०२-८ |
| १९५९-६१ | १०२-७६ |
| १९६३-६५ | १०२-११ |
| १९६६-६८ | १०२-९ |
| १९७०-७५ | १०२-९ |

**बँका**

| | |
|---|---|
| बरोडा | १९४-८ |
| सेंट्रल | १२५-० |
| इंडिया | २३९-८ |
| इंपी० | २५७०-० |
| | ६५२-८ |
| रिझर्व्ह | १५५-० |
| युनियन | १४-१० |

**वीज कंपन्या**

| | |
|---|---|
| आंध्रा व्हॅली | १८३०-० |
| बॉम्बे ट्रॅम | १६०-० |
| टाटा हायड्रो | २१९-० |
| टाटा पॉवर | १९६६-४ |

**संकीर्ण**

| | |
|---|---|
| अलकॉक | ४८५-० |
| बॉंबे स्टीम | ७१०-० |
| न्यू इंडिया | ११६-८ |
| शिवराजपुर | ५६-९ |
| टाटा केमिकल | २८-९ |
| टाटा ऑईल | ११७-० |

## सहकारी चळवळीस ऋग्वेदाचा आधार

श्री. सरय्या ह्यांनीं आपल्या भाषणांत ऋग्वेदांतील ज्या सूक्ताचा उल्लेख केला, तो खालीलप्रमाणें आहे :—

समानी व आकूतिः ।
समाना हृदयानि वः ।
समानमस्तु वो मनः ।
यथा वः सुसहासति ।

श्री ऋग्वेदसंहिता, मं. १० सू. १९१-४

**बॉंबे सेल्स टॅक्स नियम**—बॉंबे सेल्स टॅक्स नियमांचा विचार २५ एप्रिलपर्यंत तहकूब करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. त्या नियमांचे संबंधांत सूचना वगैरे करावयाच्या असल्यास, त्या वरील तारखेपूर्वी सरकारकडे कराव्यात.


फाउंटन पेनकरितां
**लोटस**
**शाई**
सर्वत्र मिळतें.

**पूना कमर्शिअल हायस्कूल**

सरकारमान्य असलेला व्यावहारिक व उपयुक्त असा एस. एल. सी. परीक्षेचा कोर्स. परीक्षा पास झाल्यावर कॉमर्स कॉलेजांत निश्चित प्रवेश. देशी व इंग्रजी पद्धतीचा जमाखर्च, टाईपरायटिंग, शॉर्ट हँड इत्यादि विषय.

व्यापारी वर्गाचे व धंदेवाईक वर्गाचे विद्यार्थ्यांसाठीं तसेंच इतरही विद्यार्थ्यांस अत्यंत उपयोगी असा अभ्यासक्रम. इंग्रजी ३ री पास झालेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश.

—विशेष माहितीसाठीं समक्ष भेटावें—

वर्ग जूनपासून सुरू होतील

पत्ताः—२५७ क, बुधवार पेठ, डॉ. भिडे यांचा वाडा.
डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्सचें ऑफिस



✣ दोन सौंदर्य प्रसाधनें ✣




पुणें—सिटी पोस्टासमोर. मुंबई—गिरगांव व काळबादेवी

डोके दुखी व मेंदूच्या सर्व विकारांवर खात्रीचा इलाज





मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

विनचूकच्या माहितीनें
स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.
किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
पुना स्टॉकिस्ट : सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
——— :इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत : ———

ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक
ओलक शिवण्याचीं यंत्रें
रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.
लिहा अगर भेटा:—व्ही. आर. बापट,
ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ,
लक्ष्मीरोड, पुणें नं. २

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७७३८

पैसा आणि ज्ञान वाढवा !
श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.
—आजच लिहा—
मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

—शुद्ध कथिलानें कल्हई लावणारे—
केळकर कल्हईवाले
कल्हईचें काम प्रत्येकाचे घरीं जाऊन केलें जाईल
आजचा भाव
दररोजचीं भांडीं शेंकडा १० रुपये
नवीन भांड्याचा भाव भांडीं पाहून
पत्ता:—C/o डॉ. डी. जी. पटवर्धन
ना. गोखले चौक, पुणें ४

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गानिवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.